ग्राम विद्युत व्यवस्थापक पदाच्या
निवडीबाबतच्या शैक्षणिक निकषाबाबत

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन शुद्धीपत्रक क्रमांकः व्हीपीएम-२०१८/प्र.क्र.२०७/पं.रा.३
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
तारीख: १९ ऑगस्ट, २०१९

वाचा :

शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम-२०१६/प्र.क्र.८/पं.रा.-३, दिनांक २० ऑक्टोबर, २०१६

शासन शुद्धीपत्रक :

महावितरण कंपनीमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांकरिता ग्रामपंचायतींनी "ग्राम विद्युत व्यवस्थापक" म्हणून काम करणेबाबतचा निर्णय संदर्भाधीन शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार ग्रामपंचायतीमध्ये ग्राम विद्युत व्यवस्थापक पदावर पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्यात येत आहे.

०२. संदर्भाधिन शासन निर्णयामधील परि.१ मधील (५) मध्ये ग्राम विद्युत व्यवस्थापकाची नेमणूक करण्याकरिता शैक्षणिक अर्हता " किमान आय.टी.आय. (इलेक्ट्रीकल-वीजतंत्री) किंवा इलेक्ट्रीकल या विषयामध्ये जास्त शिक्षण घेतलेले किंवा यांच्याशी समकक्ष असलेले सेंटर ऑफ एक्सलन्स मधील अभ्यासक्रम तसेच सदर शैक्षणिक अर्हतेशी समकक्ष असल्याबाबत शासनाने वेळोवेळी संमती दिलेलं अभ्यासक्रम" असे वाचावे. समकक्ष अभ्यासक्रमाबाबत शहानिशा करावयाची असल्यास कौशल्य विकास विभागअंतर्गत जिल्हा व्यवसाय शिक्षण अधिकारी यांच्याकडून प्रमाणित करून घेण्यात यावे.

०३. त्याचप्रमाणे संदर्भाधिन शासन निर्णयामधील परि.१ मधील (७) मध्ये ग्राम विद्युत व्यवस्थापकाची नेमणूक करण्याकरिता एकूण तीन निकष निश्चित करण्यात आले आहेत. सदर तीन निकषानंतर खालीलप्रमाणे वाचावे.

"हा शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी ग्रामपंचायतींमध्ये ज्या ग्राम विद्युत सेवकांनी ११ महिन्यांची सेवा बजाविलेली असेल व ते या शासन निर्णयान्वये विहित केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता निकष पूर्ण करीत असल्यास सदर ग्राम विद्युत सेवक हे ग्राम विद्युत व्यवस्थापकाचे काम करण्यास सक्षम असल्याचे महावितरण कंपनीकडून प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर अशा ग्राम विद्युत सेवकांची एक दिवसाचा खंड देऊन त्यांची "ग्राम विद्युत व्यवस्थापक" म्हणून नेमणूक करता येईल. मात्र अशा नेमणूक केलेल्या ग्राम विद्युत व्यवस्थापकांना यापुढे या शासन निर्णयातील तरतुदी लागू राहतील."

०४. सदर शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २०७ दि. १५/०२/२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१४१५१९१०१७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Surendrakumar Gupta

Digitally signed by Aseem Surendrakumar Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Developement Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Surendrakumar Gupta
Date: 2019.08.20 14:26:48 +05'30'

(असीम गुप्ता)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.मंत्री (उर्जा) यांचे खाजगी सचिव
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, कौशल्य विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मा.मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८. सर्व सन्माननीय विधान परिषद / विधानसभा सदस्य व संसद सदस्य
९. सर्व मंत्रालयीन विभाग
१०.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
११.सर्व विभागीय आयुक्त
१२.सर्व जिल्हाधिकारी
१३.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१४.सर्व जिल्हा कौशल्य विकास अधिकारी
१५.ग्राम विकास विभागातील सर्व कार्यासने
१६.उद्योग, उर्जा व कामगार विभागातील सर्व कार्यासने
१७.निवड नस्ती (कार्यासन पं.रा-३)